संदर्भ : लोकमत आवृत्ती : पुणे दि.२५ डिसेंबर २०१८ पान नं. २

लोकमत

## बनावट विद्यार्थ्यांना बसणार आळा : पहिल्यांदाच झाली परीक्षा

# एमपीएससीच्या सर्व परीक्षांना बायोमेट्रिक हजेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : बोगस विद्यार्थ्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) आता मुख्य परीक्षांसह सर्व पूर्वपरीक्षांसाठी विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्याच्या विचारात आहे. यापूर्वी तीन-चार मुख्य परीक्षांना ही पद्धत वापरण्यात आली. तर रविवारी (दि. २३) पहिल्यांदाच आयोगाने महिला व बालविकास विभागाच्या गट ब पदाच्या पूर्व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी घेतली. यापुढील पूर्व परीक्षांसाठीही आता ही पद्धत अवलंबण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या विविध विभागातील भरतीसाठी आयोगामार्फत परीक्षा घेतल्या जातात. थेट भरती, स्पर्धात्मक परीक्षा, विभागीय परीक्षा, मर्यादित परीक्षा घेतल्या जातात. प्रामुख्याने थेट भरती व स्पर्धात्मक परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लाखोंच्या घरात असते. स्पर्धात्मक परीक्षा या साधारणपणे पूर्व, मुख्य व मुलाखत या स्वरूपाच्या असतात. तर थेट भरती परीक्षांमध्ये पूर्व व मुलाखत अशी प्रक्रिया असते.

पूर्वपरीक्षेच्या तुलनेत मुख्य परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची संख्या खूप कमी असते. त्यामुळे आयोगाने सुरुवातीला मुख्य परीक्षांसाठी बायोमेट्रिक हजेरी घेण्यास सुरुवात केली. मागील काही महिन्यांत झालेल्या तीन ते चार परीक्षांसाठी ही हजेरी घेण्यात आली. पण पूर्व परीक्षेसाठी आतापर्यंत बायोमेट्रिकचा वापर करण्यात आला नव्हता. आयोगाकडे सर्व विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक आहेत. त्याआधारे विद्यार्थ्यांची ओळख पटविणे शक्य होणार आहे.

रविवारी (दि. २३) आयोगामार्फत निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, अधीक्षक, अधिव्याख्याता, सांख्यिकी अधिकारी गट ब या पदांसाठी पूर्वपरीक्षा घेतली. या परीक्षेसाठी सर्व केंद्रांवर बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली होती. एखाद्या पूर्वपरीक्षेसाठी पहिल्यांदाच अशी चाचपणी करण्यात आली. परीक्षा कक्षामध्ये जाण्यापूर्वीच विद्यार्थ्यांच्या अंगठ्याचा ठसा आणि छायाचित्र घेण्यात आले. या प्रक्रियेनंतर ओळखपत्राच्या झेरॉक्सवर हॉलमार्क लावण्यात आले. त्यानंतरही परीक्षा कक्षात प्रवेश दिला जात होता. तसेच परीक्षेवेळीही छापील छायाचित्रासमोर अंगठ्याचा ठसा घेतला गेला. बहुतेक विद्यार्थ्यांसाठी हे नवीन होते. पण बोगस विद्यार्थी टाळण्यासाठी ही प्रक्रिया योग्य असल्याची प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली.

### नेटवर्कअभावी विलंब

◆ रविवारी झालेल्या परीक्षेसाठी परीक्षा केंद्रात सकाळी १०.३० पर्यंत सोडण्यात येणार होते. पण काही केंद्रांमध्ये बायोमेट्रिक हजेरीसाठी विद्यार्थ्यांची झुबंड उडाली होती. त्यातच काही केंद्रांवर सातत्याने इंटरनेटचा वेग धीम्या गतीने असल्याने तर काही ठिकाणी नेटवर्क मिळत नसल्याने विलंब झाला. असे असले तरी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात सोडण्यात आले.



"बोगस विद्यार्थ्यांना परीक्षेपासून दूर ठेवणे हा बायोमेट्रिक हजेरीचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या अंगठ्याचा ठसा, छायाचित्र ही सर्व माहिती आयोगाकडे असणार आहे. मागील तीन-चार मुख्य परीक्षांसाठी अशी हजेरी घेण्यात आली. पण रविवारी पहिल्यांदाच पूर्वपरीक्षेवेळी याची चाचपणी करण्यात आली. मुख्य परीक्षेला खूप कमी विद्यार्थी असतात. या परीक्षेला १३ हजार विद्यार्थी होते. राज्यसेवा किंवा अन्य पूर्वपरीक्षांच्या तुलनेत हा आकडा तसा कमी असला, तरी ही चाचपणी यशस्वी झाली आहे. विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणून ऑफलाईन पद्धतीनेही हजेरी घेण्यात आली. त्यामुळे आता पुढील सर्व परीक्षांसाठी बायोमेट्रिक हजेरीचा विचार केला जाईल.

\- चंद्रशेखर ओक, प्रभारी अध्यक्ष, एमपीएससी

Pune Main
Page No. 2 Dec 25, 2018
Powered by: erelego.com